**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. १५/२०१३** **दि. १५.०४.२०१३**

| | |
|---|---|
| **१) मनोहर शंकर चव्हाण.**<br>**घर नं. ४५५, भोगरवणे, देवरुख**<br>**ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **१) कार्यकारी अभियंता 'महावितरण'**<br>**स व सुं विभागीय कार्यालय**<br>**रत्नागिरी.** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) श्री. व्ही. बी. जगताप**<br>**कार्यकारी अभियंता व सचिव**<br>**२) श्री.एन.ए.कुलकर्णी**<br>**सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **मनोहर शंकर चव्हाण (अर्जदार)** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **१) श्री. ए.डब्लू. महाजन**<br>**कार्यकारी अभियंता रत्नागिरी .**<br>**२) श्री. एम.एम. कांबळे**<br>**सहाय्यक अभियंता राजापुर - I.**<br>**३) श्री. आर.बी. कदम**<br>**सहाय्यक अभियंता देवरुख.** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

---

अर्जदार श्री. मनोहर शंकर चव्हाण घर न. ४५५, भोगरवणे, देवरुख, ता. संगमेश्वर यांनी राजीव गांधी ग्रामिण विद्युतीकरण योजनेअंतर्गत विज कनेक्शन मिळणेसाठी रितसर अर्ज केलेला असुन आवश्यक ती अनामत रक्कम देखिल भरलेली आहे. पण वेळोवेळी पाठपुरावा करुन देखिल विज कनेक्शन न मिळाल्याबाबतची तक्रार विहीत नमुन्यातील अर्जासह व योग्य त्या कागदपत्रासह दि. १५.०४.२०१३ रोजी मंचाकडे दाखल केलेली आहे. तक्रार प्राप्त होताच मंचाकडील पत्र क्र. ६५ दि. १६.०४.२०१३ नुसार कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय रत्नागिरी यांचेकडे स्पष्टीकरण मागविणेत आले. त्यानुसार महावितरणने त्यांचे पत्र क्र. ३१५४ दि. ०७.०४.२०१३ अन्वये आपले स्पष्टीकरण सादर केले आहे. आयोगाच्या नियमावलीनुसार उभय पक्षाना नोटीस काढण्यात येऊन दि. २१.०५.२०१३ रोजी सदर प्रकरणाची सुनावणी घेण्यात आली.

अर्जदार श्री. मनोहर शंकर चव्हाण यांच्या तक्रारीचे स्वरुप असे की, त्यांचे वरील पत्यावर घर असुन त्या घरात ते रहात आहेत. केंद्र शासनाच्या राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत विज कनेक्शन मिळणेसाठी त्यांनी महावितरणच्या स्थानिक कार्यालयात अर्ज केल्यानंतर त्यांना दि. ०५.०५.२०१० रोजी महावितरणकडुन कोटेशन देण्यात आले. त्यानंतर त्यानी त्याच दिवशी म्हणजे दि. ०५.०५.२०१० रोजी रु. १५/- इतकी अनामत रक्क म पावती क्र. ९१३४०८५ अन्वये महावितरणकडे भरणा केलेली आहे, पण वेळोवेळी पाठपुरावा करुन देखिल त्यांना महावितरणकडुन आजतागायत विज कनेक्शन देण्यात आलेले नाही.

महावितरणकडुन दाखल करण्यात आलेल्या स्पष्टीकरणामध्ये नमुद करण्यात आले आहे की, तक्रारदाराच्या अर्जानुसार कोटेशन दिल्यानंतर योग्य ती अनामत रक्कम त्यांनी दि. ०५.०५.२०१० रोजी भरलेली आहे. प्रत्यक्ष केलेल्या सर्व्हेनुसार त्यांना कनेक्शन देण्याकरीता १Ph,२w लाईनचे दहा पोल टाकुन विज वाहीनी तयार करावी लागणार आहे. राजीव गांधी ग्रामिण विद्युतीकरण योजनेअंतर्गत BPL अर्जदारासाठी लघुदाब एका पॉईटचे वायरींग करुन देण्यात येते व अत्यंत माफक दरामध्ये फक्त रु. १५/- भरुन घेऊन घरगुती वापरासाठी विज कनेक्शन देण्यात येते. सदर योजना नोव्हेंबर २००८ मध्ये सुरु झाली असुन या योजनेअंतर्गत रत्नागिरी जिल्हयाकरीता १२००० विज जोडण्या देणेचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यानुसार ११२२९ अर्ज प्राप्त करण्यात आले असुन मार्च २०१३ पर्यंत १०८४० विज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत अर्ज प्रलंबित असुन उपरोक्त अर्जदाराचा अर्ज देखिल त्यामध्ये समाविष्ट आहे. महावितरण मुख्य कार्यालय मुंबई यांच्या धोरणानुसार या योजनेअंतर्गत फक्त ३ पोल लागणा-या ग्राहकाचेच कनेक्शन देण्यासंबंधीचे आदेश असुन उर्वरीत कामे प्रलंबित ठेवण्यात आलेली आहेत. या संबंधामध्ये मुख्य कार्यालय मुंबई यांचेकडुन परवानगीचे आदेश प्राप्त झालेनंतर त्यांचे काम हाती घेण्यात येणार आहे.

महावितरणने आपल्या स्पष्टीकरणासोबत मुख्य कार्यालय मुंबई यांचे कडुन तिन पोल पेक्षा जास्त पोल विज वाहीनीची आवश्यकता असल्यास असे अर्ज प्रलंबित ठेवावेत असे वेळोवेळी आलेले आदेश पुराव्यादाखल जोडलेले आहेत. या व्यतिरीक्त महावितरणने महाराष्ट्र विज नियामक आयोग विनिमय २००६ कलम ६.२ प्रमाणे अर्जदाराने प्रथम अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे अर्ज दाखल करावयास हवा होता तसे न करता त्यांनी थेट मंचाकडे तक्रार दाखल करुन त्याच विनिमयातील कलम ६.२ व ६.४ च्या अटींचे पालन केलेले नाही. त्यामुळे मंचाने तक्रारदाराचा हा अर्ज विचारात घेऊ नये अशी विनंती केलेली आहे.

दि. २१.०५.२०१३ मध्ये घेतलेल्या सुनावणीमध्ये उभय पक्षानी उपस्थित राहुन आपला युक्तीवाद सादर केला. तक्रारदार श्री. चव्हाण यांनी आपली बाजु मांडताना स्पष्ट केले की महावितरणकडे रितसर अर्ज करुन दि. ०५.०५.२०१० रोजी पैसे भरलेले आहेत. राजीव गांधी ग्रामिण विद्युतीकरण योजनेअंतर्गत त्यांचे घरामध्ये महावितरणनेच वायरींग करुन विज कनेक्शन देणेचे आहे पण दि. ०५.०५.२०१० रोजी पैसे भरल्यानंतर वेळोवेळी पाठपुरावा करुन देखिल आज रोजी दोन वर्षाचा काळ गेला पण महावितरणकडुन कनेक्शन देण्यात आलेले नाही, चौकशी केली असता तिन पोल पेक्षा जास्त पोलची आवश्यकता असल्यास कनेक्शन देणेत येऊ शकत नाही असे सांगण्यात आले. त्यामुळे महावितरणला माझे कनेक्शन देणेबाबत मंचाकडुन आदेश व्हावा.

महावितरणकडुन श्री. महाजन कार्यकारी अभियंता यांनी युक्तीवाद केला, आपल्या युक्तीवादामध्ये त्यांनी सांगीतले की, ही योजना सुरु झाल्यानंतर सुरवातीच्या काळात कितीही पोल लागले तरी कनेक्शन दया अशा सुचना होत्या त्यानंतर फंड उपलब्ध नसल्यामुळे मुख्य कार्यालय मुंबई यांचेकडुन पत्र क्र. ED(Projects)/T/RGGVY/2921 dt. 02.02.2012 नुसार या योजनेमधील तीन पोल पेक्षा जास्त पोल लागणा-या अर्जदारांचे काम थांबविणेबाबत सुचना आलेल्या आहेत. महावितरणकडुन राबविणेत येणा-या योजनेसाठी मुख्य कार्यालयाकडुन अशा प्रकारच्या वेळोवेळी सुचना येत असतात, दरम्यानच्या काळात जर अशा प्रकारचे काम हाती घेण्याबाबत सुचना आली तर या अर्जदाराचे काम हाती घेण्यात येऊन कनेक्शन देण्यात येईल तसेच ही वाहीनी उभारणी करण्यासाठी सुमारे रु. ८०,०००/- इतका खर्च अपेक्षित असुन एका ग्राहकासाठी इतका खर्च करणे महावितरणला आर्थिकदृष्टया परवडणारे नाही. त्यामुळे वरील योजनेमध्येच हे कनेक्शन देणे क्रमप्राप्त असुन योग्य तो आदेश प्राप्त होताच हया अर्जाचा विचार करण्यात येईल.

सदर प्रकरणामध्ये दाखल झालेली कागदपत्रे, उभय पक्षानी केलेला युक्तीवाद या सर्वांचा विचार करता मंचाचा निष्कर्ष असा कि, अर्जदाराचे वरील पत्त्यावरील घर हे वाडीतील इतर घरापासुन सुमारे ३०० मिटर अंतरावर असुन अर्जदारानी विज कनेक्शन घेण्यासाठी सर्व अटींची पुर्तता केलेली आहे. अनामत रक्कम भरलेली आहे. ही वस्तुस्थिती जरी खरी असली तरी, या घरगुती कनेक्शनसाठी १० पोल लागणार असुन त्यासाठी सुमारे रु. ८०,०००/- इतका खर्च अपेक्षित

आहे. त्यामुळे हे कनेक्शन देण्यासाठी महावितरणला शासनाच्या योजनेचाच आधार घ्यावा लागेल. कारण ती शासन पुरस्कृत आहे. महावितरणने हया वाहीनी उभारणीचा खर्च करावयाचा ठरविल्यास फक्त एका ग्राहकासाठी इतका खर्च करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. राजीव गांधी ग्रामिण विद्युतीकरण योजनेअंतर्गत दिलेल्या १२००० कनेक्शनच्या उद्दिष्टापैकी १०८४० विज जोडण्या देण्यात आलेल्या असुन ९०% उद्दिष्टपुर्ती केलेली आहे ही बाब निश्चितपणे कौतुकास्पद आहे. त्यामुळे भविष्यकाळात या योजनेअंतर्गत काही सुधारीत आदेश प्राप्त झालेस तक्रारदाराच्या अर्जाचा प्रामुख्याने विचार करुन विज कनेक्शन देण्याबाबत कार्यवाही करावी.

मंचाच्या वरील निष्कर्षानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

# आदेश

**१) ग्राहकाची तक्रार मान्य करण्यात आली असुन, राजीव गांधी ग्रामिण विद्युतीकरण योजनेमधील प्रलंबित अर्जासाठी सुधारीत आदेश आल्यानंतर तक्रारदारास विनाविलंब विज जोडणी देण्यात यावी.**

**२) प्रलंबित अर्ज व त्यासाठी अपेक्षीत खर्च इत्यादी बाबी नमुद करुन असे अर्ज निकाली काढणेसाठी सुधारीत आदेश प्राप्त करुन घेण्यासाठी महावितरणने वरिष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा करावा.**

**३) या आदेशाविरुध्द ग्राहकांस अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**लोकपाल महाराष्ट्र राज्य**
**विदयुत नियामक आयोग**
**६०६/६०८ केशवा बिल्डींग/**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मुबंई ४०००५१**
**फोन नं. ०२२ / २६५२९६५**

**श्री. व्हि.बी.जगताप**
**कार्यकारी अभियंता व सचिव**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**श्री.एन्.ए.कुलकर्णी**
**सदस्य**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- १८.०६.२०१३**
**ठिकाण :- रत्नागिरी**